वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त,यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर यांच्याकडील दि.१२/०४/२०२१
४) दि.२३/०४/२०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/४३१/२०२१
दि.२३/०४/२०२१

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्रीम.शिंदे उज्वला कैलास (सहा.शिक्षिका)
सं.क्र.५७६०

आदेश,

श्रीम.शिंदे उज्वला कैलास ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सहा.शिक्षिका या पदावर कार्यरत आहेत.दि.१५/०१/१९८६ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झालेल्या आहेत.त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख ०१/०६/१९६३ अशी असुन दिनांक ३१/०५/२०२१ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम - १९८२ मधील नियम १०(१) नुसार गट "क" मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्रीम.शिंदे उज्वला कैलास यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्रीम.शिंदे उज्वला कैलास यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दुरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही. तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्रीम.शिंदे उज्वला कैलास यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

श्रीम.शिंदे उज्वला कैलास यांना सेवासातत्य देण्यात आलेले आहे, असे विद्यालयाने कळविलेले आहे.तथापी त्यांच्या पुर्वीच्या संस्थेतील भविष्य निर्वाह निधि, निवृत्ती वेतन, ग्रॅच्युटी व इतर रक्कमा पिंपरी चिंचवड मनपा कोषागरात जमा केलेल्या पावत्या नस्तीत समाविष्ट केलेल्या नाहीत. सदर रक्कमा जमा केल्याबाबत पावत्या सादर करणेकामी माध्य/शि/०१/कावि/४३१/२०२१ दि.१६/०४/२०२१ अन्वये प्र.मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर यांना कळविलेले आहे,तथापी प्र.मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर यांनी आज अखेर पिंपरी चिंचवड मनपा कोषागरात संबधीत रक्कमा जमा केलेल्या पावत्या सादर केलेल्या नाहीत.त्यामुळे श्रीम.शिंदे उज्वला कैलास सहा.शिक्षक यांची मनपा रूजु तारीख दि.१५/०१/१९८६ ही ग्राह्य धरून ३१/०५/२०२१ रोजी नियत वयोमाननुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्रीम. शिंदे उज्वला कैलास (सहा.शिक्षक) यांना दिनांक - ३१/०५/२०२१ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शिंदे उज्वला कैलास (सहा.शिक्षिका) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

Scanned with CamScanner

प्रती,
श्रीम.शिंदे उज्वला कैलास ( सहा.शिक्षिका)
माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर
प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर
२/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner